राष्ट्रीय सहकारी विकास निगम पुरस्कृत
सहकारी सूत गिरण्यांना दुरावा रक्कमे-
पोटी अर्थसहाय्य करण्याच्या सुधारित
योजना राज्यात लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्रमांक-सुतगि-११००/प्र.क्र.६०/टेक्स-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक २७ डिसेंबर,२०००

**प्रस्तावना :-** राज्यात सन १९८८-८९ पासून राष्ट्रीय सहकारी विकास निगमाची सहकारी सूत गिरण्यांना दुरावा रक्कमेपोटी अर्थसहाय्य देण्याची योजना कार्यान्वित आहे. या योजनेतंर्गत रुपये १०० लाख अर्थसहाय्य उत्पादनाखालील गिरण्यांना दुरावा रक्कमेपोटी देण्यात येते. त्या मध्ये राष्ट्रीय सहकारी विकास निगमाचा सहभाग ५०% व राज्य शासनाचा सहभाग ५०% इतका असतो. ऑक्टोबर, १९९४ मध्ये राष्ट्रीय सहकारी विकास निगमाने या योजनेचा आकृतिबंध ५०:५० कायम ठेवून अर्थसहाय्याची रक्कम रुपये १०० लाखावरुन रुपये १६० लाखापर्यंत वाढविली आहे. या योजनेचा लाभ सहकारी सूत गिरण्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी योजना राज्यात कार्यान्वित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय :-**

राष्ट्रीय सहकारी विकास निगमाने ऑक्टोबर, १९९४ मध्ये मान्य केलेली उत्पादनाखालील सहकारी सूत गिरण्यांना दुरावा रक्कमपोटी अर्थसहाय्याची सुधारित योजना राज्यात कार्यान्वित करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर अर्थसहाय्य खालील नमूद केलेल्या अटींवर मंजूर करण्यात येईल.

अ) दुरावा रक्कम म्हणून अर्थसहाय्य देताना निगमाचा व राज्य शासनाच्या अर्थसंकल्पातून सहभाग ५०:५० असा ठेवण्यात येत असून या योजनेअंतर्गत भागभांडवल स्वरुपात अर्थसहाय्याची कमाल मर्यादा राज्य शासन रुपये ८० लाख व निगम रुपये ८० लाख अशी एकूण रुपये १६० लाख अशी राहील.

ब) या योजनेअंतर्गत अर्थसहाय्याच्या रक्कमेपैकी ५० टक्के रकमेची प्रतिपूर्ती निगमाने राज्य शासनास करावयाची असून सदरहू ५० टक्के अर्थसहाय्य निगमाकडून राज्य शासनास कर्ज स्वरुपात मंजूर करण्यात येईल.

---

क) फक्त जीवनक्षम व फायदयात असलेल्या किंवा येऊ शकणा-या अशा उत्पादनाखालील सहकारी सूत गिरण्यांनाच अर्थसहाय्य करण्यात येईल.

ड) भागभांडवल परतफेडीची वैयक्तिक जबाबदारी संबंधित गिरणीच्या संचालक मंडळाची राहील.

३. गिरणी सदर योजनेअंतर्गत अर्थसहाय्य करण्यास पात्र आहे किंवा कसे, याबाबत संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सखोल छाननी करणे आवश्यक आहे. अर्थसहाय्यासाठी सादर केलेला प्रस्ताव तांत्रिक दृष्टीने योग्य आहे किंवा कसे, तसेच गिरणीने शासकीय दायित्वाची परतफेड केली आहे किंवा नाही, याबाबत संचालकांनी शिफारशीत उल्लेख करावयाचा आहे. याबाबत संचालकाने वस्तुनिष्ट अहवाल शासनास सादर करणे आवश्यक आहे व त्या दृष्टीने छाननी केल्याशिवाय प्रस्ताव निगमाकडे शिफारशीसाठी विचारात घेण्यात येणार नाही.

४. निगमाच्या या योजनांतर्गत सहकारी सूत गिरण्यांना देण्यात येत असलेले अर्थसहाय्य, त्याच प्रयोजनासाठी उपयोगात आणणे संस्थेवर बंधनकारक राहील. अर्थसहाय्याचा दुरुपयोग केल्यास संस्थेच्या संचालक मंडळावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल व संस्थेला दिलेले अर्थसहाय्य एक रकमी वसूल करण्यात येईल, अशा प्रकरणी संबंधित संस्थेच्या संचालकांना जबाबदार धरण्यात येईल.

५. सदर योजनेतंर्गत उपलब्ध करुन दिलेल्या शासकीय भागभांडवलाची परतफेड करण्यासाठी शासन निर्णय क्रमांक- सुतगि ११९७/प्र.क्र.१९३/टेक्स-१, दिनांक २४.३.१९९९ अन्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना /अटी व शर्ती या प्रकरणी ही लागू राहतील. त्यानुसार शासकीय भागभांडवलाची गिरण्यांकडून विहित कालावधीत परत फेड होईल, या दृष्टीने संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सनियंत्रण करावे.

६. निगमाच्या सदर योजनेखाली गिरण्यांना मंजूर झालेल्या अर्थसहाय्याची परत फेड करणे संबंधित गिरणीवर बंधनकारक राहील.

७. हे आदेश दिनांक २७.३.२००० (आर्थिक वर्ष १९९९-२०००) पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहतील.

८. हे आदेश नियोजन विभागाच्या सहमतीने तसेच, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ प्र.क्र. १३९७/व्यय-२,दिनांक २८.११.२००० अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सि. मं. इनामदार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
सहकार व वस्त्रोद्योग विभाग